Vol II Issue XI Dec 2012 ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 2, Issue.11,Dec. 2012
**ISSN:-2230-7850**
Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *माध्यमिक शाळांमधील मुख्याध्यापक –शिक्षक मानवी आंतरसंबंध व शालेय व्यवस्थापन परस्परसंबंध*

*पी.एस.पाटणकर , गावडे ए.एम.*

प्रभारी विभागप्रमुख,
शिक्षणशास्त्र आधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
एम.फिल. विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ कोल्हापुर

***सारांश :***

शालेय व्यवस्थापन म्हणजे शैक्षणिक ध्येयधोरणांचा विकास करणे, अध्ययन अध्यापनाच्या कार्यास प्रेरणा देणे आणि शिक्षण प्रक्रियेतील मानवी घटक व भौतिक घटकांची सुव्यवस्था करणे. शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी भौतिक साधने व सुविधा आणि मानवी संसाधनांना एकत्र करून त्याच्यामध्ये समन्वय साधुन उद्दिष्टांपर्यंत नेण्यासाठी निर्माण करण्यात येणारी यंत्रणा म्हणजे शालेय व्यववस्थापन. शालेय नियोजन व शालेय प्रशासन यांच्यातील अंर्तभुत असलेली दैनंदिन कामे करण्यासाठी शालेय व्यवस्थापनाची गरज असते.

***प्रस्तावना :***

शालेय व्यवस्थापनामध्ये भौतिक सुविधा, विद्यार्थ्यांची संख्या, विकासाचा वेग, शाळांचे निकाल, सहशालेय उपक्रम, अध्ययन अध्यापन या घटकांना विशेष महत्व आहे. वरील घटकांची गुणवत्ता टिकवून ठेवणे व वाढविणे हे शालेय व्यवस्थापनाचे मुख्य अंग आहे.

शालेय व्यवस्थापनामध्ये व्यवस्थापनाचे मानवी साधन सामग्रीचे व्यवस्थापन व भौतिक साधन सामग्रीचे असे दोन प्रकार पडतात.

शालेय व्यवस्थापनात मानवी साधन संपत्तीत मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, व्यवस्थापक मंडळ यांचा समावेश होतो. शाळेचा आणि तेथील विद्यार्थ्यांचा विकास साधण्यासाठी या घटकांचे सहकार्य व सहभाग अपेक्षित असतो. शाळेचे प्रशासन व व्यवस्थापन योग्य प्रकारे चालण्यासाठी शालेय घटक क्रियाशील व प्रामाणिक असावे लागतात. शालेय नियोजन ते संचालन या सर्वांसाठी सहयोग, सहकार्य, कामाची समान विभागणी व जवळीक असणे गरजेचे असते.

शालेय व्यवस्थापनात शाळेसाठी आवश्यक व पात्र, कर्तव्यदक्ष शिक्षक आणि कर्मचारी यांची व्यवस्था असावी. कार्याची समान वाटणी त्यांच्या पातळीवरून करून देणे, कर्तव्याची जाणीव निर्माण करणे, सहकार्य, सामंजस्य, सुसंवाद घडवून आणणे यासाठी व्यवस्थापन व मुख्याध्यापक यांची वागणुक सलोख्याची व सामंजस्याची असली पाहिजे शाळेच्या प्रगतीसाठी भौतिक साधनांचा वापर करून घेणे हे मानवी साधन संपत्तीवर निर्भर करते. म्हणून शाळेत मानवी साधन संपत्तीचे योग्य व्यवस्थापन झाले पाहिजे.

एकविसावे शतक हे तंत्रज्ञानाचे व या तंत्रज्ञानाच्या ओघाने येणाऱ्या वेगाचे शतक आहे. संगणक, दूरचित्रवाणी, मोबाईलसंच यांच्या आहारी गेलेला विद्यार्थी, भावनिक अतृप्त आहे असे स्पष्ट जाणवते. क्षणाक्षणाला बदलणारी शिक्षण पध्दती, अवजड अभ्यासक्रम यात गुंतून पडलेला शिक्षकवर्ग विद्यार्थ्यांची भावनिक भूक भागविण्यास असमर्थ ठरतोय. या सर्वांचा परिणाम विद्यार्थी शालाबाहय दुनियेतुन या गोष्टींच्या अपेक्षा करत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमधील शिस्त बिघडते आहे अशी सार्वत्रिक तक्रार आहे. बेशिस्त विद्यार्थी हा शालेय व्यवस्थापनातील प्रमुख अडथळा होऊ पहातोय.

विद्यार्थ्यांवर होणारे सुसंस्कार हे त्याच्या व्यवक्तीमत्व विकासाला पुरक असतात. या सुसंस्कारासाठी शाळेत घडणाऱ्या आंतरक्रिया बऱ्याचशा प्रमाणात जबाबदार असतात. या आंतरक्रियांचा संध थेट शालेय व्यवस्थापनाशी येतो. शालेय घटकामध्ये परस्परपुरक आंतरक्रिया घडण्यासाठी व्यवस्थापनात आवश्यकतेनुसार बदल करणे गरजेचे असते. शाळातील मानवी घटकांमध्ये सकारात्मक आंतरक्रिया घडण्यासाठी शालेय व्यवस्थापनात लोकशाही पध्दतीचा अवलंब करणे हितकारक ठरते.

एकुनच शिक्षणाचा विस्तार होत असताना शाळा, मुख्याध्यापक शिक्षक व विद्यार्थी यात लक्षणिय संख्यात्मक वाढ झाली आहे. या सर्व घटकांचा एकत्रितपणे सुसंवाद होणे सद्यस्थितीत तसे कठिणच आहे. तरीही विशिष्ट घटकांच्या सदृढ परस्परसंबंधातुन कांही सकारात्मक बदल घडू शकतात. यापैकीच एक म्हणजे मुख्याध्यापक –शिक्षक सहसंबंध या दोन घटकांच्या सुसंवादाद्वारे शाळेची एकुणच गुणवत्ता वाढू शकते, विद्यार्थी सुसंस्कारीत करता येतात. उत्कृष्ट दर्जाचे शालेय व्यवस्थापन साधता येते.

मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्यातील आंतरक्रियांद्वारे शाळेची गुणवत्ता वाढत आहे असे चित्र एखाद्या शाळेत असेल तर या आंतरक्रिया म्हणजेच शाळेतील मानवी घटकांची व्यवस्थापन योग्य प्रकारे प्रस्थापित झालेले आहे असे मानावयास हरकत नाही. शालेय व्यवस्थापनाचा वाटा नाकारता येत नसला तरी मानवी घटकांचे व्यवस्थापन हे त्यातील प्रमुख अंग आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासात हे आंतरसंबंध पर्यायाने शालेय व्यवस्थापन महत्वाची भूमिका बजावत असते.

शिक्षक आणि शिक्षकेतर सेवकांना कामासंबंधी मार्गदर्शन करणे हे मुख्याध्यापकांचे प्रमुख काम असते. शिक्षकांच्याच बाबतीत विचार करायचा झाल्यास वेळापत्रकाद्वारे काम वाटून देणे, कामाचे निरिक्षण करणे व आवश्यक तेथे मार्गदर्शन करणे ही मुख्याध्यापकांची जबाबदारी असते. या कामात आदेश देणे, सुचना करणे, चर्चा करणे, निरिक्षण करणे इ. बाबींचा समावेश आहे. शालेय व्यवस्थापनात मुख्याध्यापकांनी

विशेषतः अध्यापनाच्या बाबतीत शिक्षकांना मार्गदर्शन करणे जरूरीचे आहे. याच अनुशंगाने शिक्षकांनीही मुख्याध्यापकांशी आदराने वागणे, त्यांच्या आदेशांचे पालन करणे, वेळोवळी त्यांचे मार्गदर्शन घेणे गरजेचे असते. मुख्याध्यापक व शिक्षक यामधील याच महत्वाच्या आंतरक्रियांद्वारे शालेय व्यवस्थापन परिणामकारक होण्यास मदत होते.

### *संशोधनाची गरज व महत्व*

माध्यमिक शाळांचे शालेय व्यवस्थापन करताना मुख्याध्यापक – शिक्षक मानवी आंतरसंबंध विचारात घेणे आवश्यक ठरते. कारण मानवी संसाधनाच्या सहकार्याशिवाय शालेय व्यवस्थापन होवू शकत नाही.सद्यस्थितीमध्ये मानवी आंतरसंबंध हे गुंतागुंतीचे झाले आहेत याचे करण म्हणजे प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव, आवडीनिवडी, मानसिक व बौधिक क्षमता, दुसऱ्याला समजुन घेण्याची वृत्ती यामध्ये फरक आढळतो. शालेय परिवारात तर ही भिन्नता अधिक ठळकपणे जाणवते. या भिन्नतेतुन सुसंवाद साधण्यासाठी शाळांतील मानवी आंतरसंबंधाचा शास्त्रशुध्द अभ्यास होणे गरजेचे आहे. माध्यमिक शाळांचा विचार करता शालेय नियोजन व व्यवस्थापन करण्यासाठी मुख्याध्यापक शिक्षक मानवी आंतरसंबंधाचा संशोधक दृष्टीकोनातून अभ्यास उपयुक्त ठरू शकतो.

शैक्षणिक व्यवस्थापनामध्ये मानवी साधन सामग्रीचे व्यवस्थापन हा एक अत्यंत महत्वाचा भाग असून योग्य व्यवस्थापनासाठी कोणत्या प्रकारचे आंतरसंबंध आवश्यक आहेत याची कल्पना व्यवस्थापकास असणे आवश्यक असली पाहीजे. योग्य पध्दतीने केलेल्या संशोधनाद्वारे व्यवस्थापंना अशी कल्पना येऊ शकते.

'बदल' हा सध्याच्या जीवनपध्दतीचा कणा आहे. सततच्या बदलांमुळे प्रत्येक व्यक्तीच्या मनात स्वतःविषयी अहंभाव निर्माण झालेला आहे. दुसऱ्याचे म्हणणे ऐकुण घेणे, त्याला समजुन घेणे, त्याच्याशी समायोजन करणे हया गोष्टी आता फारच कमी पहावयास मिळतात. त्यामुळे शाळांमधील विविध मानवी घटकांमध्ये सुसंवाद साधण्यासाठी हे संशोधन महत्वाची भूमिका बजावू शकते. मुख्याध्यापक व शिक्षक यामधील आतरसंबंधाचे विद्यार्थी नकळत अनुकरण करत असतात. या आंतरसंबंधावर आधारीतच विद्यार्थ्यांचे शिक्षकांशी आंतरसंबंध तयार होत असतात. थोडक्यात मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या दैनंदिन वर्तनातूनच मुले घडत असतात. म्हणुनच मुलांच्या भवितव्याच्या दृष्टीने शाळांतील मानवी आंतरसंबंधाचा अभ्यास महत्वाचा ठरतो. या अभ्यासाद्वारे मिळालेले निष्कर्ष शालेय मानवी आंतरसंबंध सुधारण्यासाठी मदत करू शकतात. तसेच हे निष्कर्ष माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापकांना शालेय नियोजन करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.

### *समस्या विधान*

माध्यमिक शाळांमधील मुख्याध्यापक–शिक्षक मानवी आंतरसंबंध व शालेय व्यवस्थापन यांमधील परस्परसंबंध अभ्यासणे.

### *संषोधनाची उद्दिष्टे*

1. माध्यमिक शाळांमधील मुख्याध्यापक– शिक्षक यांच्या आंतरसंबंधाचा अभ्यास करणे.
2. माध्यमिक शाळांमधील शालेय व्यवस्थापनाचा दर्जा अभ्यासणे
3. मुख्याध्यापक–शिक्षक मानवी आंतरसंबंध व शालेय व्यवस्थापन यांचा परस्परसंबंध अभ्यासणे

### *संशोधनाची गृहितके*

माध्यमिक शाळांमधील मुख्याध्यापक–शिक्षक आंतरसंबंध व शालेय व्यवस्थापन यांचा परस्परसंबंध असतो

### *संशोधनाची व्याप्ती*

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शालेय व्यवस्थापन प्रक्रिया अशा सर्व घटकांना लागू होतील.

### *संशोधनाच्या परिमर्यादा*

1.प्रस्तुत संशोधन हे गडहिंग्लज तालुक्यापुरते मर्यादित आहे.
2.सदरचे संशोधन हे शालेय व्यवस्थापनापुरते मर्यादित आहे.
3.सदरचे संशोधन हे मुख्याध्यापक–शिक्षक मानवी आंतरसंबंध या शालेय घटकाशी निगडीत आहे.

### *संशोधनाची कार्यपध्दती*

सदरचे संशोधन हे वर्णनात्मक संशोधन असून त्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर केलेला आहे. यासाठी माध्यमिक शाळेतील मानवी साधनसामुग्री म्हणजेच मुख्याध्यापक, शिक्षक यांना प्रश्नावली देवून सर्वेक्षण पद्धतीने वर्णनात्मक संशोधक केले जाणार आहे.

यासाठी नमुना म्हणून निवडलेल्या 20 माध्यमिक शाळांमध्ये मानवी संसाधनाचे घटक म्हणजेच मुख्याध्यापक, शिक्षक यांच्यासाठी त्यांचे एकमेकांशी असलेले संबंध तपासण्याबाबतची प्रश्नावली तयार करून त्याद्वारे सर्वेक्षण केलेले आहे. तसेच शालेय व्यवस्थापन हे भौतिक बाबी, विद्यार्थी गुणवत्ता, शिक्षक गुणवत्ता, विद्यार्थी संख्या व शाळेच्या एकूण प्रगतीचा आलेख या घटकांना विचारात घेवून तपासलेला आहे. त्यासाठी मुख्याध्यापकांची मुलाखत घेवून त्याद्वारे सारणीमध्ये विश्लेषण करून निष्कर्ष काढले आहेत.

### *नमुना निवड*

प्रस्तूत संशोधनामध्ये नमुन्याची निवड ही सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने केलेली आहे. त्यासाठी गडहिंग्लज तालुक्यातील 62 माध्यमिक शाळांपैकी 20 मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळांची निवड करण्यात आली. ज्या शाळांमध्ये 10 पेक्षा जास्त शिक्षक आहेत अशा शाळांची हेतुपूर्वक निवड करण्यात आली.

या माध्यमिक शाळांमधील मानवी संसाधनांचा नमुना म्हणून वापर करण्यात आला. या 20 शाळांचे 20 मुख्याध्यापक, प्रत्येक शाळेतील 10 शिक्षक या प्रमाणे 200 शिक्षक यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली.

### *माहिती संकलनाची साधने*

प्रस्तुत संशोधनामध्ये माहिती संकलनासाठी प्रश्नावली या संशोधक निर्मित मानवी आंतरसंबंधाचा शोध घेणाऱ्या साधनाचा वापर केला आहे. ही प्रश्नावली मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यासाठी आहे. शालेय व्यवस्थापन तपासण्यासाठी मुख्याध्यापकांची मुलाखत या माहिती संकलनाच्या साधनाचा वापर केला आहे.प्रस्तूत संशोधनामध्ये तयार करण्यात आलेली मानवी आंतरसंबंध शोधणारी संशोधक निर्मित प्रश्नावली.

प्रश्नावली हे वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धतीमध्ये माहिती संकलनासाठी वापरण्यात येणारे योग्य व उत्कृष्ठ साधन आहे. प्रस्तूत संशोधनासाठी मुख्याध्यापकद व शिक्षक स्वतंत्र प्रश्नावल्या तयार केल्या. मुख्याध्यापकांसाठी 15 प्रश्नांची, शिक्षकांसाठी 15 प्रश्नांची प्रश्नावली तयार केली.

प्रश्न नेमकेपणाने विचारले आणि प्रत्येक प्रश्नासाठी 3 पर्याय दिले. उत्तरकर्त्यांना यापेक्षा वेगळा पर्याय लिहिण्याची मुभा देण्यात आली.

प्रस्तूत संशोधनामध्ये वापरण्यात आलेली मुख्याध्यापकांच्या मुलाखत सूची

प्रस्तूत संशोधनात माध्यमिक शाळेतील शालेय व्यवस्थापन तपासण्यासाठी मुख्याध्यापकांसाठी 25 प्रश्नांच्या आधारे मुलाखत सूची तयार करण्यात आली. सदर सूचीमध्ये शालेय व्यवस्थापन हे भौतिक सुविधा, विदयार्थी व शिक्षकांची गुणवत्ता तसेच विदयार्थी संख्या या घटकांच्या आधारे तपासण्या विषयीचे प्रश्नांचा समावेश करण्यात आला. ही मुलाखत सूचीबध्द मुलाखत स्वरूपाची आहे. या मुलाखत सूची मध्ये मुख्याध्यापकांना शाळेतील भौतिक सुविधा, विदयार्थी गुणवत्ता आणि शिक्षक गुणवत्ता याविषयीचे प्रश्न विचारण्यात आले. या घटकांचा शालेय व्यवस्थापनाशी थेट संबंध असल्यामुळे या प्रश्नांच्या उत्तराद्वारे शाळांतील मुख्याध्यापक–शिक्षक मानवी आंतरसंबंध आणि शालेय व्यवस्थापन यांचा परस्परसंबंध स्पष्ट होण्यास मदत झाली.

सदर मुलाखतीसाठी एकुण 25 गुण दिलेले असुन प्रत्येक प्रश्नाच्या होकारार्थी उत्तराला 1 गुण व नकारार्थी उत्तराला 0 गुण याप्रमाणे गुणांची विभागणी केलेली आहे.

### *उदिष्टानुसार निष्कर्ष*

प्रस्तुत संशोधनामध्ये माहिती विश्लेषणासाठी वर्णनात्मक सांख्यिकीय तंत्रांचा वापर करण्यात येणार आहे. यासाठी माहिती संकलनाच्या साधनांच्या सहाय्याने संकलित केलेल्या डाटाचे टॅब्युलायझेशन करून त्याचे गुणात्मक व संख्यात्मक विश्लेषण व अर्थनिर्वचन व स्पीअरमनसच्या सहसंबंध गंणकाचा वापर करून उदि्दष्टानुसार निष्कर्ष काढले आहेत.

### *उद्दिष्ट क्र. 1*

20 शाळांच्या मुख्याध्यापकांना पुरविलेल्या प्रश्नावलीच्या उत्तरावरून असे दियुन आले की जवळ जवळ 16 शाळेतील मुख्याध्यापक मासिक मिटींगमध्ये शिक्षकांशी सकारात्मक चर्चा करतात. शालेय नियोजनामध्ये शिक्षकांचा सहभाग घेतात. शिक्षकाने चांगले काम केल्यास त्याचे कौतुक करतात. पालकांची तकार आल्यास शिक्षकांची बाजूही समजून घेतात. शिक्षकांशी जिव्हाळयाचे संबंध ठेवतात त्यांच्या सुख–दुःखात सामिल होतात. शिक्षकामध्ये गट–तट होणार नाहीत याची काळजी घेतात. शिक्षकांमध्ये मतभेद झाल्यास सामोपचराने मिटविण्याचा प्रयत्न करतात.

याच संदर्भात 20 शाळातील 200 शिक्षकांना पुरविलेल्या प्रश्नावलीच्या उत्तरावरून असे दिसुन आले की, जवळ जवळ 16 शाळेतील शिक्षक मासिक मिटींगमध्ये मुख्याध्यापकांनी उपस्थित केलेल्या मुददयावर सकारात्मक चर्चा करतात. मुख्याध्यापकांनी दिलेल्या सुचनांचा आदर करतात. सहशालेय कार्यकमाच्या नियोजनात उत्साहाने भाग घेतात. मुख्याध्यापकांना कांही सुचवायचे असेल त्यांच्या कक्षात जाऊन चर्चा करतात. मुख्याध्यापकांशी चर्चा झाल्यास मतभेद मिटविण्यासाठी स्वतः पुढाकार घेतात. मुख्याध्यापकांशी जिव्हाळयाचे संबंध ठेवतात.

16 शाळांतील मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या उत्तरसुचीवरून असे दिसून आले की, या शाळांतील मुख्याध्यापक शिक्षक आंतरसंबंध उत्कृष्ट दर्जाचे आहेत.

20 पैकी तीन शाळांमधील मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या उत्तरसुचीवरून असे निदर्शनास आले की, शालेय नियोजनासंदर्भातील सर्व निर्णय मुख्याध्यापक एकटेच घेतात. शिक्षकांच्या चांगल्या कामाबध्दल प्रतिकिया देत नाहीत. शिक्षकांनी स्वतःची गुणवत्ता स्वतःच वाढवावी असे मत व्यक्त करतात. शिक्षकांमध्ये झालेल्या मतभेदात भाग घेत नाहीत. शिक्षकांबाबत तकार झाल्यास त्याची इतर शिक्षकाबरोबर चर्चा करतात.

अशा शाळेतील शिक्षकही मुख्याध्यापकांच्या निर्णयावर मौन पाळतात. सहशालेय कार्यकमात गरजेइतकेच सहभागी होतात. मुख्याध्यापकांनी नावडते काम सांगितल्यास कसेबसे उरकतात. स्टाफरूममध्ये मुख्याध्यापकांच्या कामातील त्रुटीबाबत चर्चा करतात. मुख्याध्यापकांशी कामापुरतेच संबंध ठेवतात. मुख्याध्यापकांना पुरस्कार मिळाल्यास मौन पाळतात.

या तीन शाळांमधील मुख्याध्यापक–शिक्षक आंतरसंबंध मध्यम दर्जाचे आहेत असे दिसून येते. 20 पैकी एका शाळेतून प्राप्त झालेल्या मुख्याध्यापक व शिक्षकांच्या उत्तसूचीद्वारे असे दिसून येते की, मासिक मिटींगमध्ये मुख्याध्यापक हकुमशाही पध्दतीने सूचना देतात. शिक्षकांच्या छोटयामोठया चुकांसाठी नोटीस काढतात. एखादया शिक्षकाच्या खाजगी आयुश्याबाबत इतर शिक्षकांशी चर्चा करतात. शिक्षकांमध्ये मतभेद असल्यास त्याचा फायदा उठवतात. शिक्षकांना चांगला शेरा देण्यासाठी अमिश स्विकारतात.

या शाळेतील शिक्षकही मुख्याध्यापकांच्या प्रत्येक मताला होय म्हणतात. मुख्याध्यापकांनी कामकाज सुधारण्याविशयी सूचना दिल्यास ऐकुन सोडून देतात. सहशालेय कार्यकमांच्या नियोजनात सहभाग घेत नाहीत. मुख्याध्यापकांच्या कामाबध्दल संस्थेकडे तकार करतात.

या शाळेतील मुख्याध्यापक–शिक्षक आंतरसंबंध निकृष्ट दर्जाचे आहेत असे स्पश्ट होते.

### *उद्दिष्ट क्र. 2*

माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापक–शिक्षक मानवी आंतरसंबंध व शालेय व्यवस्थापन यांचा परस्परसंबंध या विषयाला अनुसरून शालेय व्यवस्थापनाचा दर्जा तपासण्यासाठी मुख्याध्यापकांना पुरविलेल्या मुलाखत प्रश्नावलीच्या उत्तरसूचींवरून असे दिसून येते कि,

16 शाळांच्या इमारती स्वमालकीच्या आहेत. शाळेचे स्वमालकीचे क्रिडांगण आहे. जास्तीत जास्त मुलामुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे आहेत. संगणक कक्ष आहेत. पुरेशी फर्निचर व्यवस्था आहे. या भौतिक सुविधांसोबतच शालेय गुणवत्ता उत्कृष्ठ दर्जाची दर्शवणा–या बाबीही स्पष्ट होतात. उदा. शाळेत राज्य स्तरावर खेळणारे खेळाडू आहेत. विज्ञान उपकरणे तयार करणारे विद्यार्थी व शिक्षक आहेत. बौध्दिक क्षेत्राामध्ये उदा. स्पर्धा परीक्षात यश मिळविणारे विद्यार्थी आहेत. गायन, नृत्य, संगीत, चित्रकला अशा कलांत प्राविण्य मिळविणारे विद्यार्थी आहेत. सामाजिक कार्यात भाग घेणारे शिक्षक आणि विद्यार्थी आहेत. ब–याचशा शाळांतील शिक्षकांना त्यांच्या कार्याबध्दल पुरस्कार मिळालेले आहेत. या सर्वांचा परिणाम म्हणून शाळांनाही स्वतंत्रपणे पूरस्कार मिळालेले आहेत. या सर्वांचा परिणाम म्हणून शाळांनाही स्वतंत्रपणे पूरस्कार मिळालेले आहेत.

यावरून असे निदर्शनास येते की, 16 शाळातील शालेय व्यवस्थापन उत्कृष्ट दर्जाचे आहे.

20 पैकी तीन शाळातील मुख्याध्यापकांना पुरविलेल्या मुलाखत प्रश्नावलीच्या उत्तरसूचीवरून असे दिसून येते की, या शाळांच्या इमारती भाडेतत्वाच्या आहेत. या शाळांना पुरेशी क्रिडांगण व्यवस्था नाही. मुलींसाठी स्वतंत्र लेडीज रूम नाही. स्पर्धा परिक्षात यश मिळवणारे विदयार्थी कमी संख्येने आहेत. एस.एस.सी. परीक्षांचे निकाल 60 टक्के पर्यंतच आहेत. विज्ञान उपकरणे व शैक्षणिक साधने तयार करणारे विदयार्थी व शिक्षक मर्यादीत संख्येत आहेत. या शाळातील व्यवस्थापन मध्यम दर्जाचे आहे. असे स्पष्ट होते.

20 शाळांपैकी एका शाळेतील मुख्याध्यापकांच्या उत्तरसूचीदवारे असे स्पष्ट झाले आहे की, या शाळेत इमारत अपूरी आहे पूरेशी फर्निचर व्यवस्था नाही. विदयार्थ्यासाठी स्वच्छतागृहांची व्यवस्था नाही. विदयार्थी संख्या कमी आहे. विज्ञान प्रदर्शनासाठी उपकरणे तयार करणारे विदयार्थी, शिक्षक नाहीत अदयाप कोणत्याही शिक्षकांना त्यांच्या कामाबददल पूरस्कार प्राप्त झाला नाही शाळेत सांस्कृतिक उपक्रमात भाग घेणारे मोजकेच विदयार्थी आहेत. शाळेतील विदयार्थी व शिक्षक कोणत्याही सामाजिक उपक्रमात सहभाग घेत नाहीत शाळेत संगणक नाहीत.

या शाळेत व्यवस्थापनाचा दर्जा निकृश्ट आहे. असे स्पष्ट होते.

### *उद्दिष्ट क्र. 3*

माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक – शिक्षक आंतरसंबंध आणि शालेय व्यवस्थापन यांचा परस्परसंबंध तपासण्यासाठी सहसंबध गुणकाचा आधार घेतला. स्पिअरमनस कोरिलेशन कोइफिशंट द्वारा मुख्याध्यापक – शिक्षक आंतरसंबंधाच्या व शालेय व्यस्थापनाच्या दर्जाचे गुण तपासले असता आलेला त हा 0.52 इतका आला आहे. मानवी आंतरसंबंधाचा दर्जा व शालेंय व्यस्थापनाचा दर्जा यामध्ये उच्च दर्जाचे सकारात्मक परस्परसंबंध आहेत. मानवी आंतरसंबंधाचा दर्जा वाढत असेल तर शालेय व्यवस्थानाचा दर्जा वाढतो.

ज्या शाळातील मुख्याध्यापक–शिक्षक आंतरसंबंध उत्कृष्ट आहेत. त्या शाळातील शालेय व्यवस्थापनाचा दर्जा उत्कृष्ट आहे. ज्या शाळात असे आंतरसंबंध मध्यम स्वरूपाचे आहेत तेथे व्यवस्थापनही मध्यम दर्जाचे आहे. आणि ज्या शाळेत मुख्याध्यापक – शिक्षक यांच्यात सुसंवाद नाही. परस्परसंबंध निकृष्ट आहेत. तेथे व्यवस्थानाचा दर्जाही निकृष्ट आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, माध्यमिक शाळातील मुख्याध्यापक – शिक्षक आंतरसंबंध शालेय व्यवस्थापनावर थेट परिणाम करतात.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net